श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
(Controlled by Govt. Of Maharashtra)
☎ : 022-62491111 / 62491112
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

दिनांक : २७.११.२०२४

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : मंदिरातील पॅनासोनिक कंपनीच्या दूरध्वनी यंत्रणेचा व्दिवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत.**

मंदिरातील पॅनासोनिक कंपनीच्या दूरध्वनी यंत्रणेचा व्दिवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती –**

१) सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करावीत. एका लिफाफ्यात (Technical Bid) यामध्ये कंपनीची माहिती, मोबाईल क्रमांक,कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र,जीएसटी प्रामणपत्राची प्रत, पॅन कार्डची प्रत इ, दुसऱ्या लिफाफ्यात (Financial Bid) दरपत्रके याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन सदर लिफाफे दि. 0४ /१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत मंदिर प्रतिक्षालय इमारत तळमजला येथील आवक–जावक नोंदणी विभागामध्ये सादर करावी.

२) मंदिरातील सर्व दूरध्वनी यंत्रणेचा व्दिवार्षिक देखभाल करार करण्याबाबतचे कामाचे आदेश आपणास देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढील २ वर्षाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

३) आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा ५ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावी. आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम प्रकारचा असावा.

४) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

५) मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी १५ ते २० लक्ष असावी. याबाबत सीए प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करावी.

६) दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकातच दर भरुन देणे आवश्यक आहे. न्यास दरपत्रकात दर भरुन न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

४

७) न्यासाने नेमून दिलेली कामे विहित वेळेत न केल्यास वा काम न्यासाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार न आढळल्यास, कामात दिरंगाई होत असेल, अथवा कामात असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार न्यासास असेल.

८) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

९) दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा. (सोबत प्रत जोडावी)

१०) दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

११) माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९१११५ वर न्यासाचे पर्यवेक्षक, श्री. मंगेश कुंटे यांच्याशी संपर्क साधावा.

१२) दि.०६/१२/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Vpatil

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रकाचा तपशील

विषय : मंदिरातील पॅनासोनिक कंपनीच्या दूरध्वनी यंत्रणेचा व्दिवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत.

नाव:------------------------------------------------------------------------

पत्ता:------------------------------------------------------------------------

------------------------------------ मोबाईल क्रमांक --------------------

जीएसटी क्रमांक : ------------------------- पॅन कार्ड क्रमांक : -------------------

| Sr.no. | Description | Rate Rs. December 2024 to November 2025 | Rate Rs. December 2025 to November 2026 |
|---|---|---|---|
| 1 | M/S. Panasonic Company Telephone System maintenance & servicing | | |
| | Gst 18% | | |
| | Total Amount rs | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का